# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्र. : टी.एन.ए. (टी.एन.ए.) / आर.एस.आर./ सी.आर./९५१/९७

रौप्य महोत्सवी वर्ष

२५ वर्षे अविरत सेवेची..
आपल्या सर्वांच्या विश्वासाची...

# २४ वा
# वार्षिक अहवाल
सन २०२०-२१


**प्रशासकीय कार्यालय**

पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर-१० ए, नेरुळ (प.), नवी मुंबई-४००७०६.

फोन : ०२२-२७७०५१२७/९०२२४४७९९० • E-mail : parijatsociety@gmail.com

# पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

## विद्यमान संचालक मंडळ



श्री. कृष्णा पां. धुमाळ
अध्यक्ष (B.Com,G.D.C.&A)



श्री. कैलास वि. खोपडे
उपाध्यक्ष (B.Com,G.D.C.&A)



कै. बाळासाहेब वि. ताकवले
सचिव



श्री. दिपक शं. टेळे
खजिनदार (B.A.)



श्री. श्रीपती शं. गरुड
संचालक



श्री. अमृत दा. पाटील
संचालक



श्री. आनंदा बा. आंबवले
संचालक (B.Com)



श्री. राजेंद्र ना. कोंडे
संचालक (B.Com)



श्री. अनंत ना. प्रभाळे
संचालक



सौ. मंदाताई ज्ञा. खोपडे
संचालिका



श्रीमती लता बा. ताकवले
संचालिका



श्री. काशिनाथ वा. पवार
संचालक
नगरसेवक, न.मुं.म.पा.



श्री. शिवाजी गं. सुळ
संचालक



श्री. तानाजी गु. शिंदे
उपमहाव्यवस्थापक
(B.A.,G.D.C.&A,H.D.C.M.)

# पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.,नवी मुंबई

## भावपूर्ण श्रद्धांजली



# कै. बाळासाहेब विश्वास ताकवले

**संस्थेचे आधारस्तंभ, संस्थापक संचालक व विद्यमान सचिव**

(स्वर्गवास दि. २९/०४/२०२१)

|| श्रद्धेची अन निष्ठेची तुम्ही गुंफली फुले | प्रतिष्ठा आम्हांस लाभे केवळ तुमच्यामुळे ||
|| कष्टातून केला तुम्ही उभा सर्व पसारा | संसाराच्या नभात वाटे झाला मंगल तारा ||

**सहकारातील दुरदर्शी, सभ्य, सुसंस्कृत, सालस, नम्र आणि लोभस व्यक्तीमत्वास**
**"पारिजात" परिवाराच्या वतीने भावपूर्ण आदरांजली !!**

## राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कार २०१९




महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित आयोजीत **"दिपस्तंभ पुरस्कार २०१९"**, महाराष्ट्रातून सर्वोत्कृष्ट पतसंस्था म्हणून तृतीय क्रमांकाचा पुरस्कार **मा.श्री. सतिशजी सोनी साहेब**, सहकार आयुक्त, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते स्विकारताना संस्थेचे अध्यक्ष **श्री. कृष्णा धुमाळ**, उपाध्यक्ष **श्री. कैलास खोपडे**, सचिव **श्री. बाळासाहेब ताकवले** व खजिनदार **श्री. दिपक टेळे.**

## राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कार २०२०



महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित आयोजीत **"दिपस्तंभ पुरस्कार २०२०"**, महाराष्ट्रातून सर्वोत्कृष्ट पतसंस्था म्हणून द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार **मा.श्री. दिग्विजय आहेर**, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्या हस्ते स्विकारताना संस्थेचे अध्यक्ष **श्री. कृष्णा धुमाळ**, उपाध्यक्ष **श्री. कैलास खोपडे** व खजिनदार **श्री. दिपक टेळे.**

# पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

नोंदणी क्र. टी.एन.ए.(टी.एन.ए.)/आर.एस.आर./(सी.आर.) १५१/९७
प्रशासकीय कार्यालय : पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ (प.), नवी मुंबई-४०० ७०६.

## २४ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई या संस्थेची चोविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार दि. २५/०९/२०२१ रोजी दुपारी ४.०० वाजता** खालील विषयांकरिता (VC/OAVM) द्वारे ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. सदर सभा महाराष्ट्र शासन सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग संक्रीर्ण २०२१/प्र.क्र.२४/१३-स दि.३० जुलै २०२१ रोजीच्या परिपत्रक आदेशानुसार संस्थेचे **अध्यक्ष श्री. कृष्णा पां. धुमाळ** यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेचे **प्रशासकीय कार्यालय पारिजात भवन, प्लॉट नं.. १८, सेक्टर १० अे, नेरुळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.** येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी या सभेस ऑनलाईन उपस्थित रहावे. हि विनंती.

### * सभेपुढील विषय *

१) दि. २०/०३/२०२१ रोजी झालेल्या तेविसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक यांना मंजुरी देणे.
३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या २०२०-२१च्या नफा विभागणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल वाचुन स्विकृत करणे.
५) सन २०२१-२२ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
६) सन २०२१-२२ या वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची आणि गत वर्षाच्या अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देणे आणि मान्यता घेणे.
७) संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
८) सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचा दोषदुरुस्ती अहवाल वाचुन त्याची नोंद घेणे.
९) उपविधीतील पोट नियम दुरुस्तीस मंजुरी देणे.
१०) संस्थेच्या नवीन शाखा विस्तार करणेस मंजुरी देणे.
११) संस्थेच्या मुंबई व पुणे विभागातील शाखांसाठी स्वःमालकीची जागा खरेदी करण्यास मंजुरी देणे.
१२) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१३) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
स्थळ : नवी मुंबई
**श्री. तानाजी गुलाबराव शिंदे**
दि. ०९/०९/२०२१
(उपमहाव्यवस्थापक)

### * विशेष सूचना *

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने (VC/OAVM) द्वारे ऑनलाईन पद्धतीने ही सभा घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२) सभेत सहभागी होण्यासाठी सभासदाची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित नाही.
३) इंटरनेट सुविधा उपलब्ध असलेल्या संगणक, लॅपटॉप, स्मार्टफोनद्वारे सभासद या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सहभागी होऊ शकतील.
४) सभासदांना सभेपुर्वी सभासदांच्या संस्थेत नोंदणी असलेल्या मोबाईलवर नंबरवर एस.एम.एस. करुन ऑनलाईन लिंक पाठविली जाईल या अधिकृत लिंकद्वारे सभासदाना सभेत सहभागी होता येईल.
५) सभासदांनी आपला मोबाईल क्रमांक संस्थेत जवळच्या शाखेत दि. २१ सप्टेंबर २०२१ पूर्वी आपल्या सभासद खातेवर नोंदणी करावा. जेणे करुन सभेची लिंक देणे सोईचे होईल.
६) काही अनपेक्षित परिस्थितीत उदा. तांत्रीक कारणांमुळे सदर वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज खंडित झाल्यास तांत्रिक त्रुटींचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर सभेचे कामकाज पुढे सुरु केले जाईल. कोणत्याही सभासदास तांत्रीक अडचणीमुळे सभेस सहभागी होता आले नाही तर त्यास संस्था जबाबदार राहणार नाही.याची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.



# अध्यक्षीय मनोगत...

**सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,**

आपल्या संस्थेच्या २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने संस्थेचा सन २०२०-२१ चा कार्य अहवाल आपल्या हाती सुपुर्द करताना मनापासून आनंद होत आहे. **''ऐकमेकां सहाय्य करु अवघे धरु सुपंथ''** या भावनेतुन **''पारिजात पतसंस्था''** यशस्वीरित्या २४ वर्षे पुर्ण करुन २५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. १४ फेब्रुवारी २०२१ रोजी संस्थेचा रौप्य महोत्सवी वर्ष शुभारंभ सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत सर्व शाखांमधून दिप प्रज्वलनाने दिमाखात साजरा करण्यात आला.

आपल्या संस्थेने प्रगतीचा आलेख उंचावत ३१ मार्च २०२१ अखेर संस्थेच्या ठेवी **रु. १३२ कोटी** व कर्ज वाटप **रु. ९६** कोटीच्या पुढे असून संस्थेने **रु. ४५** कोटीपेक्षा जास्त रकमेची स्वतंत्र गुंतवणुक केलेली आहे. संस्थेचा स्वनिधी **रु. १३.६२** कोटी आहे. एकुण व्यवसाय **रु. २३०** कोटीचा आहे. **सन २०२०-२१** या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांनी संस्थेस ऑडीट वर्ग **'अ'** वर्ग दिला आहे. संस्थेच्या मुंबई व पुणे विभागात प्रशासकीय कार्यालय व १० शाखा कार्यरत आसेत. प्रशासकीय कार्यालय, वाशी, कोपरखैरणे, नेरुळ, न्यु पनवेल आणि धनकवडी शाखा या सहा कार्यालयाच्या जागा स्वमालकीच्या आहेत.

संस्थेने प्रशासकीय कार्यालयात अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ञ असे स्वमालकीच्या **''डाटा सेंटर''** उभारुन **''कोअर बँकींग संगणक प्रणाली''** द्वारे संस्था सभासदांना सेवा देत आहे. १४ फेब्रुवारी २०२१ रोजी संस्थेचा रौप्य महोत्सवी वर्ष शुभारंभ सोहळा व स्थापना दिनाचे औचित्य साधुन पुणे येथे संगणक प्रणाली **डि. आर** (Disaster Recovery) साईटचे उद्धघाटन **मा.श्री विजयजी नाहटा साहेब** (I.A.S) यांचे हस्ते ऑनलाईन पध्दतीने करण्यात येऊन संस्थेची **डि. आर.** (Disaster Recovery) साईट सुरु करण्यात आली. संस्थेच्या भविष्यातील प्रगतीसाठी **''कोअर बँकींग संगणक प्रणाली''** सेवेबरोबरच डिजीटलायजेशनची नितांत गरज ओळखून संस्थेने सभासदांसाठी पारिजात एम पासबुक सेवा, एस.एम.एस. अलर्ट सुविधा, पारिजात नेक्स्ट एजन्सी मोबाइल ॲप, बी.बी.पी.एस. युटीलीटी बिलभरणा इत्यादी डिजीटल सेवा सुरु केल्या आहेत. आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी प्रणालीद्वारे ग्राहक सेवा उपलब्ध झाल्यामुळे कोरोना व लॉकडाऊन काळात पैसे गरजेच्या वेळी मिळाल्यामुळे खातेदार खुश व समाधानी आहेत. संस्थेच्या सर्व शाखा एकमेकांशी ऑनलाईन जोडल्या गेल्यामुळे सभासदांना संस्थेच्या कोणत्याही शाखेतुन आपल्या खात्यावर व्यवहार करणे सोपे झाले आहे. संस्थेने सुरु केलेल्या पारिजात डिजीटल सेवांमुळे पारिजातची जनमानसातील प्रतिमा आणखी उंचावली आहे.

मागील दिड वर्षापासून कोव्हिड-१९ या विषाणूने आपण सर्व त्रस्त झालो आहोत. याचा परिणाम वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या आपण सर्वांनी सहन केला आहे. या भयंकर परिस्थितीत आमचे सहकारी मित्र, संस्थेचे संस्थापक, आधारस्तंभ व विद्यमान सचिव कै. बाळासाहेब विश्वास ताकवले साहेब यांचे अचानक निधन होणे, ही घटना आम्हां सर्वांच्या मनाला चटका लावणारी, खुपच दुःखदायक व पारिजात परिवारासाठी मोठा धक्का आहे.

कोव्हिड काळात संचालक मंडळाने, संस्थेचे अधिकारी व कर्मचारी यांनी सभासदांना अखंड सेवा दिलेली आहे. या काळात जिवाची पर्वा न करता सभासदांची काळजी घेतली आहे. याचा मला मनापासुन अभिमान वाटतो. आपल्या या कामाची आठवण संस्थेचे सभासद नक्कीच ठेवतील.

संस्थेच्या प्रगतीसाठी सतत झटणारे अभ्यासु संचालक मंडळ, कर्तव्यतत्पर सेवक वर्ग व दैनंदिन ठेव प्रतिनिधी आणि जागरुक सभासद यामुळेच आपली **''पारिजात संस्था''** दिमाखात चौफेर सर्वांगीण प्रगती करीत पुढे चालली आहे. हिच संस्थेच्या चांगल्या कामाची पोचपावती आहे.

आपणा सर्वांचे पुनश्चः आभार !

**जय हिंद! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!**

आपला सहकारी

**श्री. कृष्णा पां. धुमाळ**

(अध्यक्ष)

## २४ वा वार्षिक कार्य अहवाल सन २०२०-२०२१

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने दिनांक ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा २४ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना आम्हास कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे.

अहवाल वर्षात संस्थेने केलेल्या प्रगतीची व कामकाजाची कल्पना पुढील आकडेवारीवरुन येईल.

## संस्थेची वित्तीय स्थिती :-

(रु.लाखात)

| तपशिल | ३१/०३/२०२० रु. | ३१/०३/२०२१ रु. | वाढ रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ४८०.०४ | ४८७.९६ | ७.९२ | १.६५% |
| राखीव व इतर निधी | ९४६.३२ | १,०६३.७८ | ११७.४६ | १२.४१% |
| सभासद ठेवी | १२,२९२.७२ | १३,२८०.४५ | ९८७.७३ | ८.०४% |
| गुंतवणूक | ३,८८०.७९ | ४,५९०.९५ | ७१०.१६ | १८.३०% |
| सभासद कर्जे | ९,३४४.०० | ९,६८६.३३ | ३४१.४३ | ३.६५% |
| खेळते भांडवल | १४,१७८.९१ | १५,३४०.८२ | १,१६१.९१ | ८.१९% |

पारिजात संस्थेने सहकारी तत्वाचा पुर्ण सन्मान राखून आपल्या आर्थिक व सामाजिक सेवेने आम जनतेमध्ये विश्वासाची, सहकाराची, विकासाची भावना निर्माण केली आहे. सभासद ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहाय्याने व नि:स्वार्थीपणे केलेल्या अव्याहत परिश्रमामुळे संस्थेने आपल्या प्रगतीची उद्दिष्टे व आर्थिक धोरणे जोपासली असून केलेली प्रगती नेत्रदिपक आहे. याबद्दल आपले दुमत होणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

## * संस्थेच्या प्रगतीचा विस्तृत आढावा *

### सभासद : २०८८०

गतवर्षी संस्थेचे १९,७३३ सभासद होते, अहवाल वर्षात १३०९ नवीन सभासद झाले आणि १६२ सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे अहवाल वर्षाअखेर २०,८८० सभासद संख्या झाली आहे.

### भाग भांडवल : रु. ४८७.९६ लाख

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये दहा कोटी असुन गतवर्षाअखेर संस्थेचे वसुल भाग भांडवल रु. ४,८०,०३,९००/- इतके होते. त्यामध्ये अहवाल वर्षात रु. ७,९२,३००/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०२१ अखेर संस्थेचे वसुल भाग भांडवल रु. ४,८७,९६,२००/- इतके आहे. भाग भांडवल वाढीचे शेकडा प्रमाण १.६५% आहे

### गंगाजळी व इतर निधी : रु. १०६३.७८ लाख

संस्थेची जनमाणसात असलेली विश्वासार्हता ही संस्थेच्या स्वनिधीवर अवलंबून असते. निधी जेवढा जास्त तितका संस्थेचा पायाही मजबूत असतो, यानुसार संस्थेने विविध निधींची उभारणी केली आहे.

गतवर्षाचे संस्थेचे एकुण निधी रु. ९,४६,३१,७४५.२० जमा होते. त्यामध्ये अहवाल साली रु.१,१७,४५,७७२.०० वाढ होऊन वर्षा अखेरीस एकुण निधी रु.१०,६३,७७,५१७.२० इतका झाला आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण १२.४१% इतके आहे.

## ठेवी : रु. १३२८०.४५ लाख

संस्थेच्या ठेवी संकलनामध्ये अहवाल वर्षामध्ये नेत्रदिपक वाढ झालेली असून संस्था देत असलेली ग्राहक सेवा, तसेच आपणा सर्वांचा दृढ विश्वास यामुळेच हे साध्य होऊ शकले. दि. ३१ /०३/२०२० अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु. १२२,९२,७१,६५१/- एवढया होत्या. त्यामध्ये अहवाल वर्षात रु. ९,८७,७२,९२२.४८ ने ठेवींची वाढ होऊन दि. ३१/०३/२०२१ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु. १३२,८०,४४,५७३.४८ झाल्या आहेत. ठेव वाढीचे शेकडा प्रमाण ८.०४ % इतके आहे.

संस्थेच्या विविध योजनांमध्ये अहवाल वर्षाअखेर खालीलप्रमाणे ठेवी जमा झालेल्या आहेत व त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

रु. लाखात

| ठेवीचा प्रकार | सन २०१७-१८ | सन २०१८-१९ | सन २०१९-२० | सन २०२०-२१ |
|---|---|---|---|---|
| बचत ठेव | ६,४०,३३,८४९ | ७,७२,८२,९४८ | ६,९०,५९,३९४ | ७,३३,६५,७८७ |
| दैनंदिन बचत ठेव | १३,७१,५७,१०३ | १३,८५,५८,२८७ | १२,२९,६७,५२९ | १०,८०,६४,५२१ |
| अल्प मुदत ठेव | ४,७७,१२,८७२ | ५,२१,५३,६३३ | ५,८९,१०,४०९ | ४,२१,९४,१०५ |
| मुदत ठेव | १२,९४,४४,९१३ | ६,४२,८०,७२८ | ६,०२,०८,२१६ | ७,८६,२५,९०७ |
| दाम दुप्पट ठेव | ४,४२,३९,००१ | ४,६५,५०,७६० | ४,४९,१६,३०२ | ४,७३,४९,२९२ |
| पारिजात बक्षीस ठेव | १,३३,९६७ | १,३३,९६७ | १,३३,९६७ | १,३३,९६७ |
| मासिक व्याज प्राप्ती ठेव | १०,३७,७५,२१५ | ६,०३,२६,९१५ | ३,३९,६०,३९० | १,५७,१३,१९० |
| आवर्त ठेव | ६३,०३,७५६ | ८७,३२,६२४ | १,४९,३३,७०६ | १,८६,५३,७४२ |
| सभासद ठेव | ३९,३१,२७३ | ३९,०३,४५८ | ३८,२६,९९४ | ३६,९९,६६२ |
| शुभकार्य ठेव | ४,०२,५९,९०५ | ३,७३,०७,९०० | ३,४३,३२,७७२ | २,७२,५७,३३१ |
| शुभलक्ष्मी ठेव | २,७७,६६,१५० | ३,२०,८३,३१४ | ३,८५,३२,५८८ | ३,३४,८९,६१८ |
| पारिजात ठेव | २९,७३९ | २९,७३९ | २९,७३९ | २९,७३९ |
| वैभवलक्ष्मी ठेव | १९,०६,३५३ | ५२,४२९ | ४४,६३७ | ४४,६३७ |
| धनसंचय ठेव | २९,०४,५१५ | ० | ० | ० |
| धनसमृध्दी ठेव | ७,३६,५२१ | २,२६,१२१ | २,२६,१२१ | २,२६,१२१ |
| शुभसंकल्प ठेव | १,६४,१९,५४६ | २,४१,९९,१२९ | ३,२६,९८,१६२ | ३,९८,८३,७०९ |
| स्वप्नपुर्ती ठेव | १,५०,४८,५२४ | २,४६,४२,०३३ | ३,४२,११,२८० | ३,४९,२८,२५९ |
| इंद्रधनु ठेव | ४,७६,५४,४३० | ० | ० | ० |
| वर्षाऋतू ठेव | ६,५२,४८,९०२ | ४६,८७,५२० | ४८,१५८ | ४८,१५८ |
| उत्कर्ष ठेव | ४,२८,५५,१२५ | ४,२६,१३,७५६ | ४,४९,७२,७९५ | ५,८५,६६२ |
| पारिजात मासिक प्राप्ती ठेव | ४,७७,०४,३०० | १६,२४,५७,७१८ | २९,१५,६०,३८२ | ३८,०८,५१,९९७ |
| शुभारंभ ठेव | ९,५८,९२,१७७ | ११,४०,६३,६३५ | १०,०५,८९,७७४ | ९,५९,२७,४०१ |
| गृहलक्ष्मी ठेव | १,८४,४२,५०८ | २,६९,००,८८१ | ० | ० |
| वसंतऋतू ठेव | ० | ११,२५,९४,४१७ | १४,६२,२३,४९१ | १६,३६,७९,४२५ |
| लोक मंगल ठेव | ० | ७,३१,६७,७६५ | ९,६८,०४,८४५ | १२,०२,९७,५५९ |
| पारिजात रौप्य महोत्सव ठेव | ० | ० | ० | ४,२९,९४,७८४ |
| एकूण | ९५,९६,००,६४४ | ११०,६९,४९,६७७ | १२२,९२,७१,६५१ | १३२,८०,४४,५७३ |

## गुंतवणूक : रु. ४५९१.०२ लाख

संस्थेने सभासदाना कर्ज वाटप करुनही काही रक्कम शिल्लक राहिली ती रक्कम तशीच शिल्लक न ठेवता विविध बँका मध्ये त्यांची गुंतवणूक करून त्यापासून व्याज मिळवून उत्पन्न वाढीचा प्रयत्न केला आहे. सध्याच्या बँकींग क्षेत्रातील विविध बदलांमुळे गुंतवणूक ही आवश्यक बाब झाली आहे. कायदेशीर बाबींची पुर्तता म्हणूनही गुंतवणूकीस महत्त्व प्राप्त झाले आहे. आर्थिक वर्षात संस्थेने रोख तरलता प्रमाण (CRR) व वैधानिक तरलता प्रमाण (SLR) योग्य प्रकारे दैनंदिन पध्दतीवर ठेऊन महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने निधींच्या गुंतवणूकी बाबत घालून दिलेल्या सर्व नियमांचे योग्य प्रकारे पालन केले आहे.

दि. ३१/०३/२०२१ अखेर संस्थेची एकूण गुंतवणूक रु. ४५,९१,०२,४०७/- एवढी आहे.

रु. लाखात

| अ.क्र. | गुंतवणूक तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह.बँक लि., भाग | १,000.00 |
| २. | महाराष्ट्र राज्य सहकारी पत. फेडरेशन लि., भाग | ३,000.00 |
| ३. | ठाणे शहर सहकारी संस्था फेडरेशन लि., भाग | १,000.00 |
| ४. | ठाणे जिल्हा सहकारी संस्था फेडरेशन लि., भाग | १,000.00 |
| ५. | मुंबई विभागीय सहकारी संस्था फेडरेशन लि., भाग | १,000.00 |
| ६. | राखीव निधी (रिझर्व फंड) | ३,०४,८१,५४७.00 |
| ७. | संशयित बुडित कर्ज निधी | १,०५,६३,१६२.00 |
| ८. | लाभांश समानिकरण निधी | १६,३७,२०३.00 |
| ९. | सभासद कल्याण निधी | ६,४५,५११.00 |
| १०. | सेवक कल्याण निधी | ५,६९,५९२.00 |
| ११. | धर्मादाय निधी | ९६,८१२.00 |
| १२. | मुदत ठेव गुंतवणूक | ४१,५१,०१,५८०.00 |
| | एकूण | ४५,९१,०२,४०७.00 |

## कर्जे : रु. ९६८६.३३ लाख

सहकार खात्याच्या मार्गदर्शक सूचनांनुसार छोट्या व मोठ्या व्यावसायिक, व्यापारी व नोकरदार सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी व त्यांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी आपली संस्था सदैव कटिबद्ध आहे, म्हणूनच कर्ज वाटपाच्यावेळी सर्वसामान्य सभासदांना आम्ही नेहमी अग्रक्रम दिलेला आहे व त्यांना प्राधान्याने कर्ज पुरवठा करुन सभासदांचे राहणीमान उंचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कर्जदारांनी घेतलेल्या कर्जाची नियमित परतफेड करावी अशी संस्थेची अपेक्षा असते.

गतवर्षाअखेर संस्थेचे रु.९३,४४,८९,७०६/-कर्ज येणे बाकी होते अहवाल सालामध्ये संस्थेने सभासदांना रु. २७,४३,४८,०८८/- नव्याने कर्ज वाटप केले असून रु. २४,०२,०४,४८३/- कर्ज वसुल झालेले आहे. अहवाल वर्षाअखेरीस एकूण रु. ९६,८६,३३,३०५/- कर्ज येणे बाकी आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण ३.६५% एवढे आहे.

## कर्ज थकबाकी : प्रमाण ११.१२%

आपल्या संस्थेने योग्य कारणासाठी योग्य तारण घेऊन उत्तम प्रकारे कर्ज वाटप केल्यामुळे तसेच थकबाकी होऊन देण्यासाठी वेळोवेळी कर्ज वसुलीसाठी शाखा स्तरावर केलेला पाठपुरावा यामुळे कोरोना काळातही संस्थेने कर्ज थकबाकी मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. कोरोना व लॉकडाऊन मुळे मार्च २०२१ अखेर येणे कर्जाशी थकीत कर्जाचे प्रमाण वाढले आहे. सभासदांनी कर्जाची थकबाकी भरणा करुन संस्थेस सहकार्य करावे, ही अपेक्षा.

## अनुत्पादक मालमत्ता (N.P.A.) व तरतूदी :-

बँकींग व्यवसायात कर्जास मालमत्ता असेही संबोधले जाते. या मालमत्तेपासून (कर्जापासून) संस्थेस उत्पन्न न मिळाल्यास अशा मालमत्तेस 'अनुत्पादक मालमत्ता' (Non Performing Assets) असे म्हणतात व त्याची वेगळी वर्गवारी करावी लागते. याचप्रमाणे मा. सहकार आयुक्त व निबंधक महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशानुसार सहकारी पतसंस्थासाठी एन.पी.ए. निकष लागू केले आहेत. संस्थेने त्याबाबत प्रभावी व्यवस्थापन ठेवून एन.पी.ए. नियंत्रणात ठेवला आहे.

सदर अनुत्पादीत कर्जाची संस्थेने १००% पेक्षा अधिक तरतूद केलेली आहे. दि. ३१ मार्च २०२१ अखेर अनुत्पादीत कर्जाची तरतूद खालील प्रमाणे आहे.

(रु.लाखात)

| अ.क्र. | कर्जाचे वर्गीकरण | येणे कर्ज रक्कम | प्रत्यक्ष तरतूद | NPA साठी आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|
| १. | **उत्पादित जिंदगी** | ७९०१.०२ | २०.२० | -- |
| २. | **अनुत्पादित जिंदगी** | | | |
| | अ) सर्वसाधारण जिंदगी | ९०९.२२ | १६३.०० | ४५.४६ |
| | ब) संशयीत जिंदगी | ८७६.०९ | | ११६.६३ |
| | क) बुडीत जिंदगी | - | | -- |
| | एकुण | ९६८६.३३ | १८३.२० | १६२.०९ |

एन. पी. ए. साठी आवश्यक तरतूद रु.१६२.०९ लाख असताना संस्थेने स्वेच्छेने प्रत्यक्ष तरतूद रु.१६३.०० लाख इतकी केली आहे. तसेच संस्थेने चालु आर्थिक वर्षात ''उत्पादित जिंदगी'' (Performing Asset) वर ऑडीट निकषा प्रमाणे (०.२५% प्रमाणे) तरतुद रु. २०.२० लाख इतकी केली असून संस्थेची स्थिती अधिकाधिक भक्कम केली आहे, हे आपणांस कळविण्यास आनंद वाटतो.

## खेळते भांडवल : रु. १५३४०.८२ लाख

गतवर्षाअखेर संस्थेचे खेळते भांडवल रु. १४१,७८,९१,०२१/- एवढे होते. अहवाल वर्षी संस्थेने सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे रु. ११,६१,९०,६९२/- ने वाढुन रु. १५३,४०,८१,७१३/- इतके झाले आहे. खेळते भांडवल वाढीचे प्रमाण ८.१९ % इतके आहे.

## संचालक मंडळ सभा :-

संस्थेचा कारभार गतीमान होण्यासाठी अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १८ सभा होऊन एकूण ३३० ठराव पारीत करण्यात आले. तसेच कर्ज मंजुरी व वितरण समितीच्या मुंबई व पुणे विभागाच्या एकूण २८ सभा, झालेल्या आहेत. त्याचबरोबर नियोजन समिती, कर्मचारी विषयक समिती, लेखापरिक्षण समिती, संगणक समिती व कर्ज वसुली समिती यांच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी सभा घेण्यात आल्या. मा. संचालक मंडळ व सर्व समितीच्या मिळून अहवाल वर्षात एकूण ७८ सभा घेण्यात आल्या.

## सभासद, संचालक व कर्मचारी प्रशिक्षण :

तंत्रज्ञानामध्ये सतत प्रगती होत असते, तसेच नियमांत वारंवार बदल होत असतात. संस्थेचे कर्मचारी व संचालक यांचे ज्ञान अद्यावत रहावे या हेतूने तसेच शाखा पातळीवरील कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडणे, स्पर्धात्मक युगाचे आव्हान पेलण्यासाठी, ग्राहकांना चांगली व समाधानकारक सेवा देणे याकरिता संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांना विविध माध्यमातून सतत प्रशिक्षण देण्यात येते.

## नफा विभागणी : रु. ३३.४९ लाख

अहवालसाली एकूण खर्च व नियमानुसार कराव्या लागणाऱ्या तरतुदी वजा जाता रु.३३,४८,४५३.८२ नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा रु. ३८६.९६ मिळून नफा रु. ३३,४८,८४०.७८ आहे. सदर नफ्याची विभागणी पुढील प्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी. ही नम्र विनंती.

| तपशिल | | रक्कम रुपये |
|---|---|---|
| राखीव निधी (२५% प्रमाणे) | रु. | ८,३७,२१०.00 |
| लाभांश (५% प्रमाणे) | रु. | २३,५५,११२.00 |
| संशयित व बुडीत कर्ज निधी | रु. | १,५६,000.00 |
| पुढील वर्षासाठी शिल्लक नफा | रु. | ५१८.७८ |
| एकुण | रु. | ३३,४८,८४०.७८ |

## लेखापरिक्षण :-

संस्थेचे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण श्री. योगेश पाटील ॲण्ड कं. (चार्टर्ड अकौंटट) यांनी केले. त्यांनी संस्थेच्या कामकाजाबद्दल गौरवोद्गार काढले व संस्थेस **'अ'** वर्ग प्रदान केला. तसेच संस्थेचे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाची अंतर्गत हिशोब तपासणी श्री. व्ही.जी. शिंदे ॲण्ड कं. (चार्टर्ड अकौटंट) यांनी केलेली असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले. याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

## उल्लेखनीय बाबी :-

संस्थेने अहवाल वर्षात जे उल्लेखननीय उपक्रम राबविले त्याचा तसेच अन्य बाबींचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे -

१) **''कोअर बँकींग संगणक प्रणाली''** - संस्थेची प्रगती करायची असेल तर तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही हे ओळखुन सभासद व खातेदार यांना तत्पर अचुक अत्याधुनिक तंत्राद्वारे सेवा देता यावी, याकरिता संस्थेचे प्रशासकीय कार्यालयात अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असे स्वमालकीचे **''डाटा सेंटर''** उभारुन **''कोअर बॅकींग संगणक प्रणाली''** सेवेचा अवलंब केला आहे. संस्थेच्या सर्व शाखा एकमेकाशी जोडल्या गेल्यामुळे सभासदांना संस्थेच्या कोणत्याही शाखेतून आपल्या खात्यावर व्यवहार करणे सोपे झाले आहे. तसेच संस्थेने डिझास्टर रिकव्हरी साईट सुरु करुन संस्थेचा डाटा अधिक सुरक्षित केला आहे.

२) **पारिजात डिजीटल सेवा** – अहवाल वर्षात संस्थेने सभासदांसाठी सुरु केलेल्या विविध पारिजात डिजीटल सेवांमुळे संस्थेची जनमनसातील प्रतिमा उंचावली आहे.

**अ. पारिजात एम पासबुक सेवा** – संस्थेने पारिजात एम पासबुक सेवा सुरु करुन सर्व सभासदांना ठेव व कर्जखात्याची माहिती मोबाईल ॲपवर उपलब्ध केली आहे. सभासदांनी गुगल प्लेस्टोर मधुन संस्थेचे मोबाईल ॲप आपल्या मोबाईलवर डाउनलोड करावे अथवा दै. ठेव प्रतिनिधी किंवा शाखेशी संपर्क साधावा.

**ब. एस. एम. एस. सुविधा :** संस्थेने एस. एम. एस. सुविधा सुरु करुन सभासदांना खात्यामधील व्यवहाराची माहिती, ठेव मुदतपुर्ती दिनांक, कर्जहप्ता, इ एम आय सुचना इ. माहिती एस. एम. एस. सुविधाद्वारे देण्यात येते.

**क. बी. बी. पी. एस. युटीलीटी बील :** संस्थेच्या सभासदांची सर्व प्रकारची दैनंदिन वापराची बिले उदा. वीजबील, फोनबील, गॅस बील, डि टी एच रिचार्ज इ. बिले संस्थेच्या सर्व शाखांमधुन भरण्याची सुविधा बी.बी.पी.एस. युटीलीटी बील सेवा द्वारे उपलब्ध केली आहे.

**ड. पारिजात नेक्स्ट मोबाईल ॲप :** संस्थेने पारिजात नेक्स्ट मोबाईल ॲप सुरु केले असून सदर मोबाईल ॲपचा वापर करुन संस्थेचे दैनंदिन ठेव प्रतिनीधी ठेव वसुलीचे काम करत आहेत. सदर मोबाईल ॲप सुविधेमुळे खातेदारास तत्काळ खात्याविषयी माहिती उपलब्ध झाल्यामळे खातेदार खुश व समाधानी आहेत.

**इ. आर.टी.जी.एस/एन.ई.एफ.टी** प्रणालीद्वारे ग्राहक सेवा उपलब्धा झालेयामुळे खातेदार खुश व समाधानी आहेत.

३) **पुरस्कार –**

अ. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचा सलग तीन वर्ष राज्यस्तरीय **''दिपस्तंभ''** पुरस्काराने सन्मानीत संस्था

ब. सलग पाच वर्षे राज्यस्तरीय बॅको पतसंस्था पुरस्कार प्राप्त पतसंस्था.

४) **सामाजिक कार्ये –**

१. भोर तालुक्यातील दुर्गम गावात अतिवृष्टीमुळे बाधीत ग्रामस्थांना ब्लॅकेट वाटप करुन मदत.
२. मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधी, कोविड १९ ला रु. १,११,१११/– ची आर्थिक मदत.
३. केरळ पुरग्रस्तासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीत आर्थिक मदत दिली आहे.
४. शाखास्तरावर महिला दिन,महिला हळदी कुंकू,ज्येष्ठ नागरिक दिन व सभासद संवाद कार्यक्रमाचे आयोजन.
५. सैनिक कल्याण विभाग यांना ''सशस्त्र सेना ध्वजनिधी'' साठी आर्थिक मदत.
६. महंत आबानंदगिरी ट्रस्ट संचलित विद्यालयास प्रिंटर व बायोमेट्रिक मशिन मदत.
७. वर्धापन दिनी रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप व रक्त तपासणी शिबीराचे आयोजन.
८. सेवा छत्र फाउंडेशन संचलित गया–सुभद्रा अनाथ मुलींचे वसतीगृहास आर्थिक मदत.

## अभिनंदन :-

देशाचे मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी सहकाराला चालना व बळकटी देण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर नविन सहकार मंत्रालयाची निर्मिती केली व देशाचे पहिले सहकार मंत्री म्हणून मा.श्री.अमित शहा यांची निवड झाल्याबद्दल मा.श्री.नरेंद्र मोदी व मा.श्री.अमित शहा यांचे हार्दिक अभिनंदन!

महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदच्या अध्यक्ष पदी (राज्यमंत्री दर्जा) ज्येष्ठ बँकींग तज्ञ मा.श्री.विद्याधर अनास्कर यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन!

## आभार :-

सहकार क्षेत्रात उत्तम वळण लागावे, सहकार चळवळ बळकट व्हावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा. श्री. बाळासाहेब पाटील, मा. सहकार आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे मा. विभागीय सहनिंबधक सहकारी संस्था, कोकण विभाग मा.जिल्हा उपनिंबधक सहकारी संस्था ठाणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था पुणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे तसेच संस्था कार्यक्षेत्रातील सहकारी खात्याचे विविध पदाधिकारी त्यांचे ही संस्था ऋणी आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड कल्याण, महाराष्ट्र राज्य सह. बँक., ठाणे जिल्हा मध्य सह. बँक लि.,नवी मुंबई को-ऑप बँक लि.,कॉसमॉस को-ऑप.बँक लि., नॅशनल को-ऑप बँक लि.,अभ्युदय को-ऑप बँक लि., महानगर सह.बँक लि., राजर्षी शाहु सहकारी बँक लि.,दि. सातारा सहकारी बँक लि.,अपना सह.बँक लि., सारस्वत को-ऑप.बँक लि., कल्याण जनता सह.बँक लि., शामराव विठ्ठल को-ऑप.बँक लि., ठाणे जनता सहकार बँक लि., जी.पी.पारसिक जनता सह.बँक लि., भारत को-ऑप.बँक लि.,आय.सी.आय.सी आय बँक., शरद को-ऑप.बँक लि., साधना को-ऑप.बँक लि., यशवंत को-ऑप.बँक लि.,श्री. वारणा को-ऑप.ऑप.बँक लि.,श्री. विरशैव को-ऑप.बँक लि.,डि.एम.के.जावली सह.बँक लि.,आय.डी.बि.आय.बँक., यांचे शाखाधिकारी व कर्मचारी यांची संस्था आभारी आहे.

संस्थेचे २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षक श्री. योगेश पाटील ॲण्ड कं.(चार्टर्ड अकौटंट), अंतर्गत लेखापरिक्षक श्री. व्ही. जी. शिंदे ॲण्ड कं. (चार्टर्ड अकौटंट) आणि कर लेखापरिक्षक श्री. बी. आर. सावंत, संगणकासाठी मे. ट्रस्ट सिस्टम्स ॲण्ड सॉफ्टवेअर तसेच संस्थेचे कायदे विषयक सल्लागार ॲड.श्री सोपान डुबरे, ॲड.श्री. राजेंद्र शिंदे, ॲड.श्री. विलास बारवकर, ॲड. श्री. विजय नलावडे, ॲड. श्री. अशोक शिंदे यांनी संस्थेला आस्थेने मार्गदर्शन केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संस्थेचे कर्मचारी,दै.ठेव प्रतिनिधी, सभासद व ठेवीदार आणि हितचिंतकानी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संचालक मंडळ यशस्वी वाटचाल करु शकले त्याबद्दल आपणा सर्वांचे पुन्हा मनःपुर्वक आभार मानुन आपल्या लोभाची व सहकार्याची वृध्दी व्हावी, अशी प्रार्थना करतो.

## श्रध्दांजली :-

अहवाल सालामध्ये भारतातील जे थोर नेते, संशोधक,शास्त्रज्ञ,तंत्रज्ञ,साहित्यिक,पत्रकार,सैनिक, कलावंत, शिक्षणतज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, सहकार तज्ञ, आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार व हितचिंतक दिवंगत झालेले आहेत, त्यांना ही सभा नम्रतापूर्वक अभिवादन करुन त्या सर्वांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

**जय हिंद! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!**



आपला सहकारी

**श्री. कृष्णा पां. धुमाळ**

(अध्यक्ष)

| 31 / 03 / 2020 रु. पै. | CAPITAL & LIABILITIES / भांडवल व देणी | रु. पै. | 31 / 03 / 2021 रु. पै. |
|---|---|---|---|
| | **SHARE CAPITAL / भाग भांडवल** | | |
| 10,00,00,000.00 | **AUTHORISED SHARE CAPITAL / अधिकृत भाग भांडवल** | | 10,00,00,000.00 |
| 4,80,03,900.00 | **PAID UP SHARE CAPITAL / वसुल भाग भांडवल** | | 4,87,96,200.00 |
| | **RESERVE & OTHER FUND / राखीव व अन्य निधी** | | |
| 2,60,50,860.00 | 1. Reserve Fund / राखीव निधी | 3,04,70,590.00 | |
| 4,31,13,756.00 | 2. Building Fund / इमारत निधी | 4,46,87,106.00 | |
| 1,23,04,204.00 | 3. Reserve for Bad & Doubts. Debts. / संशयित व बुडित निधी | 1,63,00,009.00 | |
| 74,199.00 | 4. Charity Fund / धर्मदाय निधी | 79,807.00 | |
| 16,12,000.00 | 5. Div. Equilisation Fund / लाभांश समानिकरण निधी | 16,12,000.00 | |
| 5,35,486.00 | 6. Member Welfare Fund / सभासद कल्याण निधी | 5,35,486.00 | |
| 5,37,000.00 | 7. Staff Welfare Fund /कर्मचारी कल्याण निधी | 5,37,00.00 | |
| 2,85,279.20 | 8. Co-op Education Fund / सहकार प्रशिक्षण निधी | 2,85,579.20 | |
| 46,000.00 | 9. Contingency Fund /आकस्मिक निधी | 9,37,000.00 | |
| 13,15,000.00 | 10. Invest. Fluctuation Fund /गुंतवणूक चढउतार निधी | 64,17,000.00 | |
| 21,82,500.00 | 11. Sliver Jubilee Fund /रौप्य महोत्सव निधी | 17,42,779.00 | |
| 20,20,000.00 | 12. Contingent Prov. Agst Stand. Asstes / उत्पादित कर्ज निधी | 20,20,000.00 | |
| 40,63,963.00 | 13. Information Technology Fund / माहिती तंत्रज्ञान निधी | 2,61,963.00 | |
| 4,91,198.00 | 14. Election Fund / निवडणूक निधी | 4,91,198.00 | 10,63,77,517.20 |
| | **DEPOSITS / ठेवी** | | |
| 6,90,59,393.93 | 1. Saving Deposit / बचत ठेव | 7,33,65,787.48 | |
| 12,29,67,529.00 | 2. Daily Deposit / दैनंदिन ठेव | 10,80,64,521.00 | |
| 38,26,994.00 | 3. Member Deposit / सभासद ठेव | 36,99,662.00 | |
| 1,49,33,706.00 | 4. Recurring Deposit / आवर्त ठेव | 1,86,53,742.00 | |
| 3,43,32,772.00 | 5.Shubhkarya Deposit / शुभकार्य ठेव | 2,72,57,331.00 | |
| 3,85,32,588.00 | 6. Shubhlaxmi Deposit / शुभलक्ष्मी ठेव | 3,34,89,618.00 | |
| 3,26,98,162.00 | 7. Shubhsankalp Deposit / शुभसंकल्प ठेव | 3,98,83,709.00 | |
| 5,89,90,409.00 | 8. Short Term Deposit / अल्प मुदत ठेव | 4,21,94,105.00 | |
| 6,02,08,216.00 | 9. Term Deposit / मुदत ठेव | 7,86,25,907.00 | |
| 3,39,60,390.00 | 10. Monthly Income Scheme Deposit / मासिक व्याज प्राप्ती ठेव | 1,57,13,190.00 | |
| 4,49,16,302.00 | 11. Double Deposit / दाम दुप्पट ठेव | 4,73,49,292.00 | |
| 1,33,967.00 | 12. Parijat Prize Deposit / पारिजात बक्षीस ठेव | 1,33,967.00 | |
| 29,739.00 | 13. Parijat Deposit / पारिजात ठेव | 29,739.00 | |
| 44,637.00 | 14. Vaibhavlaxmi Deposit / वैभवलक्ष्मी ठेव | 44,637.00 | |
| 2,26,121.00 | 15. Dhansamruddhi Deposit / धनसमृध्दी ठेव | 2,26,121.00 | |
| 3,42,11,280.00 | 16. Swapnapurti Deposit / स्वप्नपूर्ती ठेव | 3,49,28,259.00 | |
| 48,158.00 | 17. Varshahrutu Deposit / वर्षाऋतु ठेव | 48,158.00 | |
| 4,49,72,795.00 | 18. Utkarsha Deposit / उत्कर्ष ठेव | 5,85,662.00 | |
| 73,67,28,504.13 | BALANCE B/F / पुढील पानावर... | | 15,51,73,717.20 |

# अखेरचे ताळेबंदपत्रक

| 31 / 03 / 2020 रु. पै. | PROPERTY & ASSETS / मालमत्ता व देणी | रु. पै. | 31 / 03 / 2021 रु. पै. |
|---|---|---|---|
| | **CASH & BANK BALANCE / रोख व बँक शिल्लक** | | |
| 30,84,255.96 | 1. Cash In Hand / रोख शिल्लक | 21,49,074.07 | |
| 1,91,97,237.83 | 2. Cash at Bank / बँक शिल्लक | 1,38,24,172.53 | 1,59,73,246.60 |
| | **INVESTMENT / राखीव निधी** | | |
| 1,000.00 | 1. Share at T.D.C.C Bank Ltd. / ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह.बँक लि. (भाग) | 1,000.00 | |
| 3,000.00 | 2. Share at M.S.C. Soc. Fed./महा.राज्य सह. पतसंस्था फेडरेशन लि. (भाग) | 3,000.00 | |
| 1,000.00 | 3. Share at Thane City Soc. Fed. / ठाणे शहर सह.पतसंस्था फेडरेशन (भाग) | 1,000.00 | |
| 1,000.00 | 4. Share at Thane District Society Fed. / ठाणे जिल्हा सह. पतसंस्था फेडरेशन (भाग) | 1,000.00 | |
| 1,000.00 | 5. Share at Mumbai Div. Society Fed. / मुंबई विभागीय पतसंस्था फेडरेशन (भाग) | 1,000.00 | |
| 2,60,68,049.00 | 6. T D C C Bank Ltd (Reserve Fund) / ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह.बँक लि.(राखीव निधी) | 3,04,81,547.00 | |
| 1,25,23,094.00 | 7. T D C C Bank Ltd (Other Fund) / ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह.बँक लि. (इतर निधी) | 1,35,12,280.00 | |
| 2,06,92,198.00 | 8. T D C C Bank Ltd / ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह.बँक लि. (मुदत ठेव) | 2,06,92,198.00 | |
| 2,86,20,254.00 | 9. Navi Mumbai Co-op Bank Ltd / नवी मुंबई को-ऑप. बँक लि. (मुदत ठेव) | 2,00,00,000.00 | |
| 20,00,000.00 | 10. National Co-op Bank Ltd / नॅशनल को-ऑप. बँक लि. (मुदत ठेव) | 20,00,000.00 | |
| 50,16,644.00 | 11. Abhyudaya Co-op Bank Ltd /अभ्युदय को-ऑप. बँक लि. (मुदत ठेव) | 50,16,644.00 | |
| 3,17,27,374.00 | 12. Saraswat Co-op Bank / सारस्वत को-ऑप. बँक (मुदत ठेव) | 4,98,78,844.00 | |
| 3,41,76,258.00 | 13. Apna Sakhakari Bank / अपना सह. बँक (मुदत ठेव) | 4,00,61,529.00 | |
| 1,08,05,600.00 | 14. Mahanagar Co-op Bank / महानगर को-ऑप. बँक (मुदत ठेव) | 1,08,05,600.00 | |
| 3,13,79,699.00 | 15. Punjab & Maha. Co-op Bank / पंजाब अँन्ड महा. को-ऑप. बँक (मुदत ठेव) | 3,20,06,186.00 | |
| 2,15,08,792.00 | 16. Shamrao Vitthal Co-op Bank / शामराव विठ्ठल को-ऑप. बँक (मुदत ठेव) | 4,00,13,549.00 | |
| 2,66,24,911.00 | 17. TJSB Saha. Bank Ltd. / ठाणे जनता सह.बँक लि. (मुदत ठेव) | 2,97,84,139.00 | |
| 2,53,91,614.00 | 18. GP Parsik Sah. Bank Ltd. / जीपी पारसिक को-ऑप. बँक लि. (मुदत ठेव) | 3,50,72,254.00 | |
| 2,90,00,000.00 | 19. D M K Jaoli Sah. Bank Ltd. / डीएमके जावली सह. बँक लि.(मुदत ठेव) | 2,65,00,000.00 | |
| 1,75,00,000.00 | 20. Satara Sah. Bank Ltd. / सातारा सहकारी बँक लि. (मुदत ठेव) | 1,75,00,000.00 | |
| 1,25,00,000.00 | 21. Sharad Sah. Bank Ltd. / शरद सहकारी बँक लि. (मुदत ठेव) | 1,03,02,744.00 | |
| 3,32,40,073.00 | 22. Bahrat Co-op Bank Ltd. / भारत को-ऑप. बँक लि. (मुदत ठेव) | 4,03,60,914.00 | |
| 55,20,404.00 | 23. Shree Warna Sah. Bank Ltd. / श्री वारणा सहकारी बँक लि. (मुदत ठेव) | 55,20,404.00 | |
| 50,00,000.00 | 24. Shree Veershaiv Co-op Bank Ltd / श्री विरशैव को-ऑप. बँक लि. (मुदत ठेव) | 50,00,000.00 | |
| 52,83,664.00 | 25. Kalyan Janta Sah.Bank Ltd. / कल्याण जनता सह. बँक लि. (मुदत ठेव) | 0.00 | |
| 10,00,000.00 | 26. Yashwant Sah. Bank Ltd. / यशवंत सह. बँक लि. (मुदत ठेव) | 10,86,575.00 | |
| 25,00,000.00 | 27. Sadhana Sah. Bank Ltd. / साधना सह. बँक लि. (मुदत ठेव) | 25,00,000.00 | |
| 0.00 | 27. Cosmos Bank Ltd. / कॉसमॉस बँक लि. (मुदत ठेव) | 1,40,00,000.00 | |
| 0.00 | 28. ICICI Bank Ltd. / आयआयसीआय बँक लि. (मुदत ठेव) | 70,00,000.00 | 45,91,02,407.00 |
| | **LOANS / कर्जे** | | |
| 2,47,41,695.00 | 1. Personal Loan / वैयक्तिक कर्ज | 2,21,61,136.00 | |
| 2,42,98,950.00 | 2. Business Loan / व्यवसाय तारण कर्ज | 2,01,76,392.00 | |
| 38,56,384.00 | 3. Vehicle Loan / वाहन तारण कर्ज | 39,52,285.00 | |
| 66,18,78,241.00 | 4. Secured Loan / सुरक्षित तारण कर्ज | 70,04,66,903.00 | |
| 4,04,414.00 | 6. Govt. Security Loan / शासकीय रोखे तारण कर्ज | 2,62,510.00 | |
| 26,21,280.00 | 7. Case File Loan / दावा दाखल कर्ज | 14,59,746.00 | |
| 61,02,972.00 | 8. Staff Personal Loan / कर्मचारी वैयक्तिक कर्ज | 52,10,582.00 | |
| 7,20,743.00 | 9. Staff Vehicle Loan / कर्मचारी वाहनतारण कर्ज | 7,00,159.00 | |
| 94,38,061.00 | 10. Staff Housing Loan / कर्मचारी घरतारण कर्ज | 1,14,38,247.00 | |
| 21,87,000.00 | 11. Staff Emergency Loan / कर्मचारी तातडीचे कर्ज | 15,10,006.00 | |
| 29,44,850.00 | 12. Agent Loan / दैनंदिन ठेव प्रतिनिधी कर्ज | 23,90,624.00 | |
| 6,43,68,641.00 | 13. Deposit Loan / ठेवतारण कर्ज | 7,35,34,479.00 | |
